**Time: 3 Hours** | **MARCH – 2023** | **[Max. Marks: 80]**

**वेळ : ३ तास** | **बोर्ड पेपर – मार्च २०२३** | **एकूण गुण : ८०**

## विभाग – १ : गद्य

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा. [०२]

(i) पहाटे चार वाजता शेवटची गाडी इथून जाते. – ☐

(ii) निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठले. – ☐

(iii) स्टेशन इथून खूप दूर होतं. – ☐

(iv) पुलावरचे रूळ चांगल्या स्थितीत होते. – ☐

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल. निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं तर परीक्षा बुडणार होती. मग नापास. भडसावळे गुरुजींची मदत बंद. शिक्षणही बंद. रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं, परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठलं. त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रूळांबद्दल सांगितलं, पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जव केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या.

(२) आकृती पूर्ण करा. [०२]

निरंजन नापास झाल्यास होणारे परिणाम → ☐ , ☐

(३) स्वमत. [०३]

तुम्हाला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) चौकटी पूर्ण करा. [०२]

(i) मावशींचे राहण्याचे ठिकाण → ☐

(ii) मावशींना लेकाने दिलेली भेट → ☐

(iii) झोपडीपुढे लावलेले झाड → ☐

(iv) निळ्या तुकड्याच्या मधोमध उमटलेली → ☐

''मावशी, तुम्ही राहता कुठं?''

''त्या टेकडीपल्याड'' , मावशी म्हणाल्या.

''इथून किती कि. मी. आहे?''

''तीन.''

''तुम्ही कशा आलात इथपर्यंत?''

''गेल्या मयन्यापतूर चालतच येत हुते, पन आता माज्या लेकानं एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते'', अशी अजून बरीच माहिती त्यानं भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते? ही फिरस्ती तुम्ही कशी करता? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत?

रेखामावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यांतलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. ''आणि आता पाहा, या आहेत रेखामावशींच्या फूटप्रिन्टस........! असं म्हणत त्यानं मोबाईलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा! सगळे 'आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली ....... एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले ........ 'सिल्व्हर फूटप्रिन्टस! दि मोस्ट क्लिन फूटप्रिन्टस!!'

''वाऽ पाह्यलंत रेखामावशींचे पाय चंदेरी आहेत.''

(२) कोण ते लिहा. [०२]

(i) रेखामावशींची माहिती घेणारा - ☐

(ii) चंदेरी पाय असलेल्या - ☐

(३) स्वमत. [०३]

'ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम' तुमच्या शब्दात लिहा.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) आकृती पूर्ण करा. [०२]

विनोबा यांच्या मते धडधाकट व अपात्राला दान केल्याने होणारे परिणाम

- [ ]
- [ ]

दारावर कुणी भिक्षा मागण्यास आला तर आई त्याला भिक्षा घालत असे. एके दिवशी एक धडधाकट भिकारी आला असता रूक्मिणीबाई त्याला भिक्षा घालू लागल्या. विनोबा त्यांना म्हणाले, "हा तर धडधाकट दिसतो. अशा लोकांना जर भिक्षा देत गेलो तर देशात आळस वाढेल. अपात्राला दान केले तर त्यामुळे दान देणाऱ्याचेही अकल्याण होते."

रूक्मिणीबाईंनी ते शांतपणे ऐकले आणि म्हणाल्या, "विन्या, पात्र-अपात्र यांची परीक्षा करणारे आम्ही कोण? दारावर आलेला प्रत्येक माणूस परमेश्वररूप समजून त्याला शक्तीनुसार देत राहणे एवढे आपले काम आहे. त्याची परीक्षा करणारी मी कोण"? विनोबांनी त्यावर टिपणी केलीय की, 'आईच्या या युक्तिवादावर विन्याला दुसरा, युक्तिवाद सुचला नाही'.

(२) जोड्या लावा. [०२]

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) दारावर भिक्षा मागायला येणारा | (१) रूक्मिणीबाई |
| (ii) भिकाऱ्याला भिक्षा घालणाऱ्या | (२) विनोबा |
| (iii) आईच्या युक्तिवादावर टिपणी करणारे | (३) भिक्षेकरी |
| (iv) मुलाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणाऱ्या | (४) रूक्मिणीबाई |

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) चौकटी पूर्ण करा. [०२]

(i) डोळे भरून पहावी अशी – [ ]

(ii) मुठीमध्ये नसलेले – [ ]

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिंद्दीचे;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.

(२) एका वाक्यात उत्तरे लिहा. [०२]

(i) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?

(ii) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते?

(३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. [०२]

| | | | |
|---|---|---|---|
| (i) द्रव्य – | | (ii) आसवे – | |
| (iii) औक्षण – | | (iv) कल्लोळ – | |

(४) 'सैनिक सीमेवर तैनात असतो म्हणून आपण सुरक्षित राहतो', या विधानातील भाव स्पष्ट करा. [०२]

**प्रश्न २. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा. [०८]**

| | मुद्दे | 'दोन दिवस' किंवा 'स्वप्न करू साकार' | |
|---|---|---|---|
| (१) | प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – | | [१] |
| (२) | प्रस्तुत कवितेचा विषय – | | [१] |
| (३) | प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहा. | 'हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले.' | 'या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार.' [२] |
| (४) | प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | | [२] |
| (५) | प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा | (i) जिंदगी –<br>(ii) बरबाद –<br>(iii) हरघडी –<br>(iv) दुनिया – | (i) ललकारणे – [२]<br>(ii) नौबत– –<br>(iii) विभव– –<br>(iv) श्रम – |


## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. [०६]**

(१) टीप लिहा – डॉ. होमी भाभा.

(२) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वतःच्या कल्पनेने लिहा.

(३) टीप लिहा.



## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा. [०२]

(i) राष्ट्रगीताचा मान राखा.

(ii) हुशारीचे किती ते तेज त्याच्या चेहऱ्यावर!

(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा. [०२]

(i) तो दररोज व्यायाम करतो. (प्रश्नार्थी करा.)

(ii) मन अशांत नव्हते. (होकारार्थी करा.)

(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (फक्त दोन). [०४]

(i) आर्जव करणे

(ii) उत्साहाला उधाण येणे

(iii) अंगाचा तिळपापड होणे.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती.**

(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [०१]

(अ) शालीन – ☐ (ब) आनंद – ☐

(ii) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [०१]

(अ) खाजगी × ☐ (ब) चूक × ☐

(iii) वचन बदला. [०१]

(अ) बांगडी – ☐ (ब) मित्र – ☐

(iv) लिंग ओळखा. [०१]

(अ) डोंगर – ☐ (ब) शिक्षिका – ☐

**(२) लेखननियमांनुसार लेखन.**

खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा. [०२]

(i) इथले शीक्षक मनाने खुप श्रीमंत होते.

(ii) वाघीणीनं नाला पार करून बांबुच्या गंजीत पाय ठेवला.

**(३) विरामचिन्हे.**

खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून वाक्ये पुन्हा लिहा. [०२]

(i) लाल हिरव्या बांगड्यांकडे त्याने कौतुकाने बघितले

(ii) आईने नाराजी व्यक्त केली पण उपयोग झाला का

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन.**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही **एक** कृती सोडवा. [०६]

जनता विद्यालय अहमदनगर
आयोजित
जिल्हास्तरिय चित्रकला स्पर्धा
दि. २ जानेवारी वेळ – स. १०.००
संपर्क – मुख्याध्यापक, जनता विद्यालय, अहमदनगर
E-mail–janatavidya02@gmail.com
मोबा.–०२११५५६६८०

↓

अभय/आर्या दळवी विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.

**किंवा**

उत्तम आयोजनाबद्दल मुख्याध्यापकांना अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**(किंवा)**

**(२) सारांशलेखन.**

विभाग १ – गद्य (इ) (प्र. क्र. १–इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [१०]

**(१) जाहिरात लेखन.**

योगासन वर्गाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**(२) बातमीलेखन.**

तुमच्या शाळेत ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' साजरा झाला. या कार्यक्रमाची बातमी लिहा.

**(३) कथालेखन.**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा.

मुद्दे- अनाथ मुलगा - रोज सकाळी वर्तमानपत्राचे वाटप - दुपारी शाळेत - रस्त्यात एक पाकीट मिळते - वर्गशिक्षकांकडे देणे - पाकिटावरील पत्त्यावरून योग्य व्यक्तीपर्यंत पोहचवणे - मालकाला आनंद - शाबासकी - मुलाला बक्षीस व त्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे.

**प्रश्न ५. (इ) लेखनकौशल्य.**

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही **एक** कृती सोडवा. [०८]


**(१) प्रसंगलेखन:**

अश्वमेध सभागृह
-दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या-
-कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन-
दि. १५ डिसेंबर वेळ- स. १० ते रा. ८
प्रमुख पाहुणे - श्रीमती कला परांजपे
३५ दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेल्या
वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती पाहण्याची संधी.

वरील प्रदर्शन पाहण्यासाठी तुम्ही गेला होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

**(२) आत्मकथन.**

चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा.




**(३) वैचारिक.**

'मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व' या विषयावर तुमचे विचार लिहा.

★★★

**Time: 3 Hours** **MARCH – 2023** **[Max. Marks: 80]**

## उत्तरपत्रिका

### विभाग – १ : गद्य

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.** [०२]

(i) पहाटे चार वाजता शेवटची गाडी इथून जाते. – चूक

(ii) निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठले. – बरोबर

(iii) स्टेशन इथून खूप दूर होतं. – बरोबर

(iv) पुलावरचे रूळ चांगल्या स्थितीत होते. – चूक

* (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)

**(२) आकृती पूर्ण करा.** [०२]

**निरंजन नापास झाल्यास होणारे परिणाम**
- भडसावळे गुरुजींची मदत बंद
- रेल्वेने फिरायचे स्वप्नही अपुरे राहणार

**(३) स्वमत.** [०३]

**तुम्हाला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये लिहा.**

**उत्तर:** विद्यार्थी म्हणजे तो पहिला आज्ञाधारक पाहिजे. विद्या आत्मसात करण्यासाठी उत्सुक पाहिजे. ज्ञानाची आवड पाहिजे. नम्रता हा गुण प्रत्येक विद्यार्थ्यात आवश्यक आहे. आपल्या आई-वडिलांप्रमाणेच शिक्षकांचा मानसन्मान व आदर त्याने केला पाहिजे. प्रयोगशील वृत्ती, मेहनती, कष्टाळू, जिज्ञासूवृत्ती व वैज्ञानिक दृष्टीकोन विद्यार्थ्यात असला पाहिजे.

सामाजिक जाणीव, देशप्रेम व बंधुत्वता या तत्तवांची जाण विद्यार्थ्याला असणे आवश्यक आहे. केवळ अभ्यासुवृत्ती नव्हे तर चांगले-वाईट, सत्याची ओळख त्याला असावी. माणुसकी व प्रामाणिकपणा ही खऱ्या विद्यार्थ्याची गुणवैशिष्ट्ये आहेत.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा.** **[०२]**

**(i) मावशींचे राहण्याचे ठिकाण** → टेकडीच्या पलीकडे

**(ii) मावशींना लेकाने दिलेली भेट** → सायकल

**(iii) झोपडीपुढे लावलेले झाड** → लिंबोणीचे

**(iv) निळ्या तुकड्याच्या मधोमध उमटलेली** → दोन पावलं

✲ **(उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) कोण ते लिहा.** **[०२]**

**(i) रेखामावशींची माहिती घेणारा** – सुमित

**(ii) चंदेरी पाय असलेल्या** – रेखा मावशी

**(३) स्वमत.** **[०३]**

**'ग्लोबल वार्मिंगचे दुष्परिणाम' तुमच्या शब्दात लिहा.**

**उत्तर:** ग्लोबल वार्मिंगमुळे दिवसें दिवस प्रदूषणात वाढ होत आहे. जंगले आगीच्या भक्षस्थानी पडल्याने जंगले नष्ट होत आहेत, यामुळे अनेक पशू-पक्षी आणि प्राणी नष्ट होत आहेत. पृथ्वीवरील तापमानात वाढ झाल्याने सजीवसृष्टी धोक्यात आली आहे. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. हिमनग वितळत आहेत. उष्णतेमुळे कार्बनडाय-ऑक्साइडचे प्रमाण वाढते. अनेकांना श्वसनाचे विकार जडत आहेत. त्वचा रोगांचे प्रमाणही वाढत आहे.

जगाचे तापमान वाढल्यामुळे शेती व ग्रामीण विकासावरही याचा मोठा परिणाम होत आहे. उत्पादन घटत आहे. निसर्गाचे चक्र बदलले आहे. वादळे, पूर अशा नैसर्गिक आपत्तींमध्ये वाढ झाल्याने मनुष्य हानी व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत आहे.

अशा प्रकारे ग्लोबल वार्मिंगमुळे पृथ्वीतलावरील जीवसृष्टीच धोक्यात आली आहे.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृती पूर्ण करा.** **[०२]**

**विनोबा यांच्या मते धडधाकट व अपात्राला दान केल्याने होणारे परिणाम**

- आळस वाढेल
- दान देणाऱ्याचेही अकल्याण होते.

*** (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) जोड्या लावा.** **[०२]**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) दारावर भिक्षा मागायला येणारा | भिक्षेकरी |
| (ii) भिकाऱ्याला भिक्षा घालणाऱ्या | रूक्मिणीबाई |
| (iii) आईच्या युक्तिवादावर टिपणी करणारे | विनोबा |
| (iv) मुलाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणाऱ्या | रूक्मिणीबाई |

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा.** **[०२]**

**(i) डोळे भरून पहावी अशी** – विजयाची दौड

**(ii) मुठीमध्ये नसलेले** – द्रव्य

*** (कविता कृतीपत्रिकेत पाहा.)**

**(२) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[०२]**

**(i) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते?**

**उत्तर:** जेव्हा मुठीमध्ये द्रव्य व शिरेमध्ये रक्त नसते, तेव्हा कष्टाचे सामर्थ्य अपुरे वाटते.

**(ii) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते?**

**उत्तर:** रणांगणावर लढताना सर्वत्र गोळीबार व धुरांचे लोट असतात. तोफा धडाधडत असतात. अशावेळी जीवाची पर्वा न करता शत्रूशी लढत राहिल्यामुळे सैनिकाचे पाऊल जिद्दीचे वाटते.

**(३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

| | | | |
|---|---|---|---|
| (i) द्रव्य – | पैसा, संपत्ती | (ii) आसवे – | अश्रू |
| (iii) औक्षण – | ओवाळणे | (iv) कल्लोळ – | लोट |

**(४) 'सैनिक सीमेवर तैनात असतो म्हणून आपण सुरक्षित राहतो', या विधानातील भाव स्पष्ट करा.** **[०२]**

**उत्तर:** आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी दिवस-रात्र सैनिक सीमेवर तैनात असतात. यामुळेच आपण सुरक्षित आहोत. ऊन, पाऊस, थंडी, वारा याची तमा न बाळगता अहोरात्र देशाच्या सीमेचे रक्षण सैनिक करतात. यामुळेच शत्रू आपल्या देशात प्रवेश करू शकत नाही. आपले घर-दार, शेती-वाडी कुटुंब सोडून देशसेवेचा ध्यास घेतलेल्या जवानांमुळे आपली संपत्ती व कुटुंब सुरक्षित आहे याची जाणीव प्रत्येक नागरिकाला असली पाहिजे.

जीवनातील सर्व सुखाचा त्याग करून देशरक्षणासाठी सैनिक सीमेवर तैनात असल्याने आज आपण सुरक्षित आहोत.

**प्रश्न २. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.** **[०८]**

**'दोन दिवस'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री.** **[०१]**

**उत्तर:** नारायण सुर्वे

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय.** **[०१]**

**उत्तर:** कष्टकरी, कामगारांच्या जीवनाची भीषण वास्तविकता.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.** **[०२]**

**'हे हात माझे सर्वस्व;**
**दारिद्र्याकडे गहाणच राहिले.'**

**उत्तर:** कष्टकरी कामगारांचे दु:ख व्यक्त करताना कवी नारायण सुर्वे म्हणतात, कष्ट करणाऱ्या कामगारांसाठी त्यांचे हातच सर्वकाही असतात. आपल्या हाताने कष्ट करून ते आपला उदरनिर्वाह करून पोट भरतात. किती ही कष्ट केले तरीही त्यांचे जीवन दारिद्र्यातच असते व तो कायम दु:खी असतो. सुखाच्या दोन दिवसांची वाट पाहत असतो. परंतु दारिद्र त्याचा पिच्छा सोडत नाही. जणुकाही कष्टकऱ्यांचे हात दारिद्र्याकडे गहाणच पडलेले असतात.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.** [०२]‘

**उत्तर:** ‘दोन दिवस’ही कविता आवडली. या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी कष्टकरी कामगारांच्या जीवनाचे वास्तव चित्र मांडले आहे. दोन दिवस सुखात व दोन दिवस दु:खात जातात. यात सारे जीवन खर्ची पडते व फक्त अश्रूंची साथ लागते हे शब्द मनाला भिडतात.

अत्यंत साधी, सोपी व सुबोध भाषेतून गरिबांच्या जीवनाचे मांडलेले चित्र हृद्यस्पर्शी आहे.

**(५) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** [०२]

**(i)** **जिंदगी** – आयुष्य **(ii)** **बरबाद** – नष्ट

**(iii)** **हरघडी** – प्रत्येक वेळी **(iv)** **दुनिया** – जग

**किंवा**

**‘स्वप्न करू साकार’**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री.** [०१]

**उत्तर:** किशोर पाठक

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय** [०१]

**उत्तर:** देशाची कृषिसंस्कृती, श्रमप्रतिष्ठा, एकजुटीचे सामर्थ्य हा विषय कवितेत आहे.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.** [०२]

**‘या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार.’**

**उत्तर:** ‘स्वप्न करू साकार’ या कवितेत कवी किशोर पाठक यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे. या देशाच्या मातीवर भारतीयांचा हक्क सांगितला आहे व आम्ही भारतीय नव्या पिढीचे व नव्या युगाचे असून देशाचे उज्जवल भविष्य आम्ही साधणार असून आपल्या अधिकाराची व कर्तव्याची जाणीव करून दिली आहे.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.** [०२]

**उत्तर:** प्रस्तुत कविता मला आवडली कारण कवीने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे. तसेच नैतिक मूल्य जोपासून देशप्रेम व्यक्त केले आहे. साधी, सोपी, सुबोध भाषा मनाला स्पर्शून जाते.

**(५) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** [०२]

**(i)** **ललकारणे** – पुकारणे **(ii)** **नौबत** – प्रसंग, डंका, नगारा

**(iii)** **विभव** – ऐश्वर्य **(iv)** **श्रम** – कष्ट

## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[०६]**

**(१) टीप लिहा – डॉ. होमी भाभा.**

**उत्तर:** डॉ. होमी भाभा यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला म्हणून त्यांचे नाव या संस्थेला दिले आहे. बार्क या संस्थेत ते शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होते. प्रचंड स्फूर्तिदायक व्यक्तिमत्त्व होते. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देताना मुलांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन असावा, अशी शिकवण त्यांनी मुलांना दिली. बॉसने सांगितले तेवढेच काम करायचे, ही प्रवृत्ती न ठेवता संशोधन करा, तुम्ही स्वत:च काम निर्माण करा, असा सल्ला त्यांनी दिला. एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून जगाला त्यांची ओळख आहे.

**(२) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वत:च्या कल्पनेने लिहा.**

**उत्तर:** सूर्य: चल पणती, मी निघतो. माझ्या बरोबर हे कामगार, पक्षी, प्राणी सुद्धा आपल्या घराकडे चाललेत.

पणती: बरं सूर्यदेव!

सूर्य: मी घरी गेल्यानंतर तू यांना प्रकाश देतेस. तुला माझा नमस्कार.

पणती: होय, प्रकाश देते, पण तुझ्याइतका प्रखर प्रकाश मी देऊ शकत नाही. पण ते माझ्या प्रकाशात नित्याची कामे करू शकतात.

सूर्य: होय, सगळ्यांना प्रकाश देणे हे आपले कामच आहे.

पणती: माझा हा रोजचा जीवनक्रम झाला आहे. तू घरी गेल्यावर मी प्रकाश देते.

सूर्य: मी सकाळी येताच मला सर्वजण नमस्कार करतात आणि कामाची सुरवात करतात.

पणती: होय देवा, संध्याकाळी म्हणजे तू गेल्यावर मी येते, त्यावेळी मला सर्व नमस्कार करतात.

सूर्य: जो दुसऱ्यांना प्रकाश देतो, आनंद देतो, त्यास सर्व नमस्कार करतात.

पणती: पृथ्वीवरील अंधार काही काळापुरता दूर करते व सर्वांना प्रकाश देते.

सूर्य: मानवाला मदत करणे, सजीवांची रक्षा करणे हे आपल्याकडून पुण्याचे काम होते.

पणती: होय देवा! आपण आपली ही कार्ये पृथ्वीवर अशीच चालू ठेवू व सर्वांना आनंदात ठेवू.

(३) **सग्वारो कॅक्टस**

**उत्तर: सग्वारो कॅक्टसचे दिसणे –** इतर झाडांप्रमाणेच सग्वारो कॅक्टसचे झाड नसते. कॅक्टस म्हणजे वरच्या बाजूला निमुळता होत गेलेला एक सरळसोट खांब: कॅक्टसला फांद्या असतात. त्या सुद्धा सरळसोट खांबासारख्या सग्वारो कॅक्टस तर हात वर करुन उभ्या राहिलेल्या बाहुल्यासारखा दिसतो.

**सग्वारो कॅक्टसचे उपयोग –** अमेरिकेतील रेड इंडियन लोक अवर्षणाच्या काळात कॅक्टस चेचून त्याचे पाणी काढतात. तहान भागवण्यासाठी सग्वारोची फळे आवडीने खातात. कॅक्टसला काटे फार असतात. याची पाने जनावरांनी खाल्ली तरी काट्यांमुळे झाडाचे संरक्षण होते: याची फळे साखर पाकात घालून मोरावळ्यासारखी टिकवता येतात.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **[०२]**

**(i) राष्ट्रगीताचा मान राखा.**

**उत्तर:** आज्ञार्थी वाक्य

**(ii) हुशारीचे किती ते तेज त्याच्या चेहऱ्यावर!**

**उत्तर:** उद्गारवाचक वाक्य

**(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** **[०२]**

**(i) तो दररोज व्यायाम करतो. (प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** तो दररोज व्यायाम करत नाही का?

**(ii) मन अशांत नव्हते. (होकारार्थी करा.)**

**उत्तर:** मन शांत होते.

**(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (फक्त दोन).** **[०४]**

**(i) आर्जव करणे –** विनंती करणे, विनवणी करणे

**उत्तर:** पगार लवकर देण्यासाठी नोकर मालकाकडे आर्जव करीत होता.

**(ii) उत्साहाला उधाण येणे –** अतिशय आनंद होणे.

**उत्तर:** दिवाळीच्या सुट्टीत मुलगा सीमेवरून घरी आल्यामुळे आईच्या उत्साहाला उधाण आले होते.

**(iii) अंगाचा तिळपापड होणे. –** खूप राग येणे

**उत्तर:** राजू नेहमी खोटे बोलतो, म्हणून दादाच्या अंगाचा तिळपापड होतो.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती.**

**(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** (अ) शालीन – नम्र, विनम्र (ब) आनंद – हर्ष, मोद

**(ii) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** (अ) खाजगी × सार्वजनिक (ब) चूक × बरोबर

**(iii) वचन बदला.** **[०१]**

**उत्तर:** (अ) बांगडी – बांगड्या (ब) मित्र – मित्र

**(iv) लिंग ओळखा.** **[०१]**

**उत्तर:** (अ) डोंगर – पुल्लिंग (ब) शिक्षिका – स्त्रीलिंग

**(२) लेखननियमांनुसार लेखन.**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.** **[०२]**

**(i) इथले शीक्षक मनाने खुप श्रीमंत होते.**

**उत्तर:** इथले शिक्षक मनाने खूप श्रीमंत होते.

**(ii) वाघीणींनं नाला पार करून बांबुच्या गंजीत पाय ठेवला.**

**उत्तर:** वाघिणीनं नाला पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला.

**(३) विरामचिन्हे.**

**खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वाक्ये पुन्हा लिहा.** **[०२]**

**(i) लाल हिरव्या बांगड्यांकडे त्याने कौतुकाने बघितले**

**उत्तर:** लाल, हिरव्या बांगड्यांकडे त्याने कौतुकाने बघितले.

**(ii) आईने नाराजी व्यक्त केली पण उपयोग झाला का**

**उत्तर:** आईने नाराजी व्यक्त केली पण; उपयोग झाला का?

---

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन.**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.** **[०६]**

✲ **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

दिनांक: ०३ डिसेंबर, २०२२.

प्रति,

माननीय मुख्याध्यापक,

जनता विद्यालय,

अहमदनगर – ४१४००१.
**विषय:** जिल्हास्तरिय चित्रकला स्पर्धेत सहभागी करून घेण्याबाबत.
माननीय महोदय,
सप्रेम नमस्कार,
मी अभय दळवी, एच.एम.पी. स्कूल, अहमदनगर या शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी आहे. आमच्या शाळेतील इयत्ता दहावीच्या वीस विद्यार्थ्यांना जिल्हास्तरिय चित्रकला स्पर्धेत सहभागी होण्याची इच्छा आहे. या विद्यार्थ्यांची नावे मी आपणास मुख्याध्यापकांच्या परवानगीने पाठवत आहे.
आपण कृपया आपल्या शाळेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरिय चित्रकला स्पर्धेत आम्हाला सहभागी करून घ्यावे ही नम्र विनंती.
कळावे!
आपला विश्वासू,
अभय दळवी,
(विद्यार्थी प्रतिनिधी)
एच.एम.पी. स्कूल,
अहमदनगर – ४१४००१.
ई–मेल आयडी – abc@gmail.com

**(किंवा)**

दिनांक: ०३ मार्च, २०२३.
प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
जनता विद्यालय,
अहमदनगर – ४१४००१.
**विषय:** चित्रकला स्पर्धेच्या उत्तम आयोजनाबद्दल अभिनंदन.
माननीय महोदय,
सप्रेम नमस्कार,

मी अभय दळवी, एच. एम. पी. स्कूल, अहमदनगर या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी आहे. आमच्या शाळेतील सूचना–फलकांवर तुमच्या जनता विद्यालय, अहमदनगर शाळेत ०२ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता 'जिल्हास्तरिय चित्रकला स्पर्धा' आयोजित केली आहे अशी सूचना लावली होती.

सदर स्पर्धेसाठी आमच्या शाळेतील २० विद्यार्थी सहभागी झाले होते. चित्रकला स्पर्धेचे उत्तम आयोजन आपल्या शाळेने केले होते. जिल्ह्यातील अनेक शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. उत्तम वर्ग व्यवस्था, स्वच्छता, पाण्याची व्यवस्था व त्याचबरोबर मार्गदर्शनासाठी तुमच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची अदबशीर व स्नेहपूर्ण भाषा यामुळे आम्ही विद्यार्थी भारावून गेलो.

आपल्या सारख्या कर्तबगार मुख्याध्यापकांमुळे व तुमच्या उत्कृष्ट नियोजनामुळे आम्हा कलाकरांना योग्य संधी व मार्गदर्शन मिळते. आपले सर्वांचे अभिनंदन!

आपला विश्वासू,
अभय दळवी,
(विद्यार्थी प्रतिनिधी)
एच.एम.पी. स्कूल,
अहमदनगर - ४१४००१.
ई-मेल आयडी - abc@gmail.com

**(किंवा)**

**(२) सारांशलेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** शरीराने धडधाकट असलेल्या माणसाला भिक्षा देणे म्हणजे ते अपात्राला केलेले दान. अशाने आळस वाढेल असे विनोबांना वाटते. विनोबांची आई रूक्मिणीबाईंच्या मते दारावर आलेला प्रत्येक माणूस हा ईश्वराचे रूप आहे.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[१०]**

**(१) जाहिरात लेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

**"आरोग्यम् धनसंपदा"**
**"विजयबाबा योगा क्लासेस"**
वैशिष्ट्ये
**तज्ञ व अनुभवी योगा शिक्षक**
**लहानांपासून ते वृद्धापर्यंत सर्वांसाठी**
विविध योगासने वर्ग
**सकाळी ७.०० ते ९.०० / संध्याकाळी ६.०० ते ८.००**
**आपल्या सोयीनुसार प्रवेश**
**मोफत आरोग्य तपासणी व आहार सल्ला**
**फक्त ५००/- रुपये दरमहा-वार्षिक फी फक्त ५०००/- रुपये**
**संपर्क: ९८१९७२४७८१ व ९८९२८२८८१८**
गोविंदाश्रम, आरती निवास, पहिला मजला,
गोकुळधाम, गोरेगाव (प.), मुंबई - ४०००६०.
email vta@gmail.com
**अंधेरी शाखा लवकरच सुरू. त्वरा करा!**

`

(२) बातमीलेखन.

* (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)

उत्तर:

**'शिक्षक दिन संपन्न'**

आमच्या वार्ताहरांकडून, दि. ०६ सप्टेंबर, २०२३ (मुंबई)

वर्तमान पिढीला मार्गदर्शन करून नवीन पिढी तयार करण्याचे व देशासाठी आदर्श नागरिक घडवण्याचे कार्य शिक्षक करतात, असे प्रतिपादन कॅप्टन विजय अवसरमोल यांनी केले.

अंधेरी येथील एच.एम.पब्लिक स्कूल मध्ये शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. या दिवशी शाळेचे सर्व कामकाज विद्यार्थ्यांनी चालवले. शाळा संपल्यानंतर शाळेच्या सभागृहातच विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. नृत्य, संगीत, मिमिक्री व नाट्य अशा भरगच्च मेजवानीने भरलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमार जितेंद्र महाजन यांनी केले.

सदर कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी व माजी विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजना देसाई यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून मार्गदर्शनपर भाषण केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

(३) कथालेखन.

* (मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)

उत्तर:

**प्रामाणिक राजू**

रामपूर नावाचे एक छोटेसे गाव होते. या गावात राजू नावाचा एक गरीब मुलगा राहत होता. लहानपणीच अपघातात आई-वडील देवाघरी गेल्यामुळे मंदिरातल्या गाभाऱ्यातच पुजाऱ्याबरोबर तो राहत होता. राजू गरीब असला तरी हुशार व प्रामाणिक होता.

गावातच असलेल्या माध्यमिक शाळेत तो आठवी इयत्तेत शिकत होता. शाळेचा खर्च व आपला उदरनिर्वाह करण्यासाठी तो सकाळी-सकाळी उठून वर्तमानपत्राचे वाटप करत होता व ते काम झाल्यावर शाळेत जात असे. एके दिवशी पेपर वाटप करून तो घाई-घाईने शाळेत जात होता. रस्त्याच्या फूटपाथवरून जात असताना त्याला एक पैशाचे पाकीट मिळाले. पाकिटात भरपूर पैसे व कागदपत्रे होती.

राजूने ते पाकीट शाळेत गेल्याबरोबर आपले वर्गशिक्षक महाजन सरांकडे दिले. सरांनी पाकीट पाहिले असता त्यात, पाच हजार रुपये व इतर कागदपत्रे होती. पाकिटामधून मिळालेल्या कागदपत्रावरून सरांनी पाकिटाच्या मालकाला शाळेत बोलावले. पाकीटाचा मालक जवळच्या गावातील एक मोठा साखर कारखानदार होता. पाकीट मिळताच मालकाला आनंद झाला. महाजन सरांनी राजूची माहिती पाकीट मालकाला दिली. त्यांना राजूच्या हुशारीचे व प्रामाणिकपणाचे कौतुक वाटले व त्याला शाबासकी दिली.

राजूच्या शिक्षणाची जबाबदारी त्यांनी घेतली व त्याला चांगले कपडेलत्ते दिले. गावातच त्याच्या राहण्या-खाण्याची सोय केली.

**तात्पर्य:** प्रामाणिकपणाचे फळ हे नेहमीच चांगलेच मिळते.

**प्रश्न ५. (इ) लेखनकौशल्य.**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[०८]**

**(१) प्रसंगलेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

**मी पाहिलेले आगळे-वेगळे प्रदर्शन**

डिसेंबर म्हणजे वर्षाचा शेवटचा महिना. आई-बाबा आपली सुट्टी संपवण्यासाठी मुंबईत आले होते. त्याचवेळी १५ डिसेंबर रोजी गोरेगांव येथील आझाद मैदानावर आयोजित कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन भरले होते. एका भव्य अशा वातानुकूलित मंडपात हे प्रदर्शन आयोजित केले होते.

दूरूनच प्रदर्शनाच्या प्रवेशद्वाराकडे मन आकर्षित होत होते. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला कृत्रिम झाडाच्या खोडातील कमळ व विशालकाय हत्ती स्वगतासाठी ठेवले होते. फुलांची आकर्षक मांडणी केली होती. सर्व वयोगटाचे लोक या प्रदर्शनासाठी आले होते. हे प्रदर्शन होते दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या कलात्मक वस्तूंचे.

दिव्यांग मुलांनी राख्या, विविध आकर्षक वस्तू, टाकाऊ वस्तूंपासून बनवलेले सुंदर टिकाऊ फ्लॉवरपॉट, टेबल मॅट, तोरणे, कुंड्या, पेन स्टँड, वेगवेगळी खेळणी यांचे अनेक स्टॉल प्रदर्शनात होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन श्रीमती कला परांजपे मॅडमनी केले. प्रदर्शनात ३५ दिव्यांग व्यक्तींनी आपल्या कलाकृती सादर केल्या होत्या. भारतीय प्राचीन संस्कृती, कला व आधुनिक औद्योगिक प्रगती या कला प्रदर्शनात पाहायला मिळाल्या. तसेच देशातील विविध राज्याचे स्टॉल उभारले होते. त्या राज्यातील संस्कृती, परंपरा व सण उत्सव यांची माहिती देणारे चित्र फलक सुद्‌धा मुलांनी प्रदर्शित केले होते.

खाद्य संस्कृती जोपासण्यासाठी विविध खाद्य-पदार्थांचे स्टॉल मंडपात होते. अनेकांनी येथे भरपूर मजा केली.

प्रदर्शनात केवळ मनोरंजन न होता ज्ञानातही भर पडत होती. मुले शरीराने दिव्यांग असली तरीही आपल्या कलाकृतीतून त्यांनी सादरकेलेली आपली कला पाहून सर्वजण थक्क झाले होते. प्रदर्शनात मांडलेल्या शोभेच्या बाहुल्या, मूर्ती यातील जीवंतपणा याची सर्वचजण दाद देत होते. एक आगळे - वेगळे व चिरकाल स्मरणात राहील असे प्रदर्शन पाहता-पाहता कधी संध्याकाळचे आठ वाजले हे समजलेच नाही. प्रदर्शनातील स्मृती व दिव्यांगांची प्रेरणा घेऊन आम्ही घरी परतलो.

(२) आत्मकथन.

✻ (मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)

उत्तर:

**पुस्तक**

नेहमीप्रमाणे एक दिवस मी वाचनालयात निघालो. माझी पुस्तकं मला बदलायची होती आणि नवीन कोणती पुस्तके आली आहेत हे ही बघायचे होते.

वाचनालयात आत गेलो आणि प्रत्येक रॅक बघत होतो. तिथे एका विभागाकडे मी वळलो, परंतु पुस्तके खूप जुनी वाटली म्हणून मी पुढे गेलो. लगेच कोणीतरी माझा हात खेचतोय असा मला भास झाला म्हणून मी मागे वळून बघितले, तर ज्या पुस्तकाकडे मी वळलो आणि पुढे निघून गेलो होतो तीच पुस्तके मला बोलावत होती. त्या पुस्तकांच्या गटातील एक म्होरक्या पुढे येऊन बोलू लागला.

"ए बाळा, तू आमच्याकडे बघून पुढे का निघून गेलास? आम्ही वाचकांची वाट बघत असतो. तुम्ही मात्र बघून नेहमीच न बघितल्यासारखे करता आणि पुढे जाता. तुम्ही कधी विचार केलात? आमचा जन्म किती कष्टाने होतो ते."

"आता पुस्तकाचे स्वरूप बदलले आहे. डिजीटलचा जमाना आला. पण आम्हीही तुम्हाला ज्ञान, मनोरंजन देत असतो, आनंद देत असतो. आमच्याशीही मैत्री करावी असे मी तुम्हाला आवाहन करतो. आमच्याशी मैत्री करून तुम्हाला आनंदच मिळणार आहे. आनंदाबरोबर असे ज्ञान मिळेल की जे काही कारणास्तव काळाच्या पडद्याआड गेले आहे."

"परंतु खंत हीच आहे की बदललेल्या काळाप्रमाणे तुम्ही ही बदलत जाता आणि आमच्याकडे वळणे कमी होत जाते."

"जुने ते सोने, या न्यायाने तुम्ही आमच्याशी बोलावे असे मला वाटते."

मला एकदम वाईट वाटले आणि मी तिथेच ठरवले की आजपासून सर्व प्रकारची पुस्तके वाचायची. पुस्तकाचे आभार मानले आणि मी वाचनालयातून बाहेर पडलो.

(३) वैचारिक.

✻ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)

उत्तर:

**'मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व'**

मनुष्याच्या जीवनात पाण्याचे फार मोठे महत्त्व आहे. पाण्याशिवाय आपण जगूच शकत नाही. आपल्या दैनंदिन जीवनात प्रत्येक ठिकाणी मानवाला पाण्याची आवश्यकता आहे. स्नान, स्वयंपाक, साफ सफाई, कपडे, गाडी धुणे इत्यादींसाठी पाण्याची आवश्यकता असते. आपल्या शरीरात अर्ध्याहून अधिक वजन पाण्याचे आहे.

सजीव सृष्टीसाठी पाणी अत्यावश्यक आहे. यामध्ये केवळ मनुष्य नव्हे तर प्राणी, पक्षी, वनस्पती यांनाही पाण्याची नितांत गरज आहे. पाणी या ग्रहावरील मानवाला मिळालेली एक उत्तम देणगी आहे. मनुष्य अन्ना शिवाय काही काळ जगू शकतो पण पाणी नसल्यास तीन दिवसात त्याचे अस्तीत्व धोक्यात येईल. म्हणूनच पाण्याचा वापर जपून केला पाहिजे.

पाणी केवळ आपल्या जगण्यासाठी नव्हे तर आनंदी व आरोग्यदायी जीवनासाठी

आवश्यक आहे. पाऊस, नदी, सागर, तळे, सरोवर, विहिरी हे पाण्याचे स्तोत्र आहे. पाण्याशिवाय पृथ्वीवरील जीवन त्रस्त आहे. शेतकऱ्यांचे जीवन हे पाण्यावर अवलंबून असते. यासाठी पाण्याचा साठा करणे आवश्यक आहे. यासाठीच वॉटर हार्वेस्टिंग सिस्टमला शासन प्रोत्साहित करत आहे. पाणी ही निसर्गाची देणगी आहे. निसर्गाच्या या देणगीचा गैरवापर केल्याने आज पाण्यावाचून शेती ओस पडत आहे. नदी, नाले, विहिरी कोरड्या झाल्या आहेत. पाण्याचाही काळाबाजार केला जातो व आज एक लीटर पाण्यासाठी वीस रुपये मोजावे लागत आहेत, यासाठी प्रत्येकाने पाण्याचा वापर जपून केला पाहिजे.

थेंबे, थेंबे तळे साचे म्हणजे पाण्याचा साठा केला पाहिजे. पाण्यापासूनच वीज बनते, उद्योग धंदे, कारखाने, शेती व्यवसाय या साठी पाणी पाहिजे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पाणी पाहिजे. पाण्याच्या महत्त्वपूर्ण उपयोगामुळे पाण्याला पृथ्वीवरील अमृत असे म्हटले जाते. अन्न, वस्त्र व निवारा ही मानवाची मुलभूत गरज आहे. असे असले तरी सजीव सृष्टी साठी पाणी हेच जीवन आहे.

रंग, गंध व चव नसलेले पाणी हे द्रव्य अमृतासमान आहे. पाण्याशिवाय पृथ्वीचे अस्तित्व राहणार नाही. अशा या पाण्याचे जीवनातील उपयोग पाहता मानवच नव्हे तर सृष्टीला पाण्याची गरज आहे. या पाण्याचे रक्षण आपण करू या!